महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.२०/२०२२/३१ दिनांक - २० जुलै, २०२३

- : **प्रसिद्धीपत्रक**:-

**विषय :-** लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गांच्या टंकलेखन कौशल्य चाचणीच्या निकषाबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक ३१ मे, २०२३ रोजी लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गांसाठी टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुत टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी आयोगाकडुन खालीलप्रमाणे निकष निश्चित करण्यात आला आहे:-

प्रत्यक्ष चाचणीमध्ये देण्यात आलेले key depression विचारात न घेता, चाचणीची पात्रता ठरविताना पहिल्या १५०० key depression नुसार जेवढे शब्द तयार होतात, त्या शब्दांच्या ९३ % बरोबर शब्द अराखीव उमेदवारांसाठी व त्या शब्दांच्या ९०% बरोबर शब्द राखीव उमेदवारांसाठी असा निकष निश्चित करण्यात आला आहे.

उदा. १९०० key depression असलेल्या उता-यात प्रत्यक्ष पात्रता ठरविताना त्या उता-यातील पहिल्या १५०० key depression नुसार जर २३६ शब्द तयार होत असतील तर उमेदवारांच्या पात्रतेसाठी खालीलप्रमाणे पात्रता लागू होईल:-

अराखीव उमेदवार - २३६ शब्दांपैकी २१९ बरोबर शब्द

राखीव उमेदवार - २३६ शब्दांपैकी २१२ बरोबर शब्द

ही आकडेवारी केवळ उदाहरणादाखल दिलेली आहे. टंकलेखन कौशल्य चाचणीवेळी दिल्या जाणा-या उता-यातील key depression ची संख्या व पात्रतेसाठी आवश्यक ठरणा-या बरोबर शब्दांची संख्या वेगळी असु शकेल.

**२.** उपरोक्त निकषानुसारच यापुढे आयोजित केल्या जाणा-या सर्व टंकलेखन कौशल्य चाचणीमधील उमेदवारांची पात्रता ठरविण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : नवी मुंबई

सह सचिव,<br>
दक्षता, धोरण व संशोधन,<br>
महाराष्ट्र लोकसेवा आयोग